# शैलेश पुरोहित

# गोवा

## कथा दोन सहलींची

१९८० व २०२२



a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# A tale of two trips- दोन पर्यटन कथा

# गोवा- १९८०-२०२२

शैलेश न. पुरोहित

लेखक : शैलेश न. पुरोहित
ए/२, जस्मिन, संत रामदास मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.
टेली: ८४५२८०३६६३.
ई मेल : shain_p@rediffmail.com shainpu1208@gmail.com

छायाचित्रं : शैलेश, गंधर्व पुरोहित, व इंटरनेट

डिझाइन पार्टनर : स्वराली

चित्रण : CANON 70D, DJI OSMO POCKET

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन :  २२ डिसेंबर २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
    - आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
    - हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य -प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
- सदर प्रवास वर्णनाचा तसेच सोबतच्या छायाचित्रांचा अंशतः अथवा पूर्णतः वापर करण्याआधी लेखकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.



आमच्या पहिल्या वहिल्या सहलीचे सहप्रवासी,

वनिता आत्या (नीता) व तिचे पती श्री. नारायण जावळे यांच्या स्मृतीस अर्पण

श्री. शैलेश पुरोहित यांची इतर पुस्तके

**वायनाड**

**इंद्रपुरी सिक्कीम**

**नौकुचीयाताल**


**जीवनगौरव (कथासंग्रह)**


नक्की वाचा

सोबतच्या कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल

a


इंद्रपुरी
सिक्कीम
शैलेश पुरोहित
नरेंद्र गोळे


शैलेश पुरोहित
नौकुचीयाताल


शैलेश पुरोहित
वायनाड


शैलेश पुरोहित
जीवनगौरव
आणि इतर कथा

# प्रस्तावना



गेल्या काही वर्षांत आमचे पर्यटन काहीसे वाढले आहे. परंतु चाळीस – बेचाळीस वर्षांपूर्वी म्हणजे १९८० पर्यन्त आमची मजल फारतर नाशिक किंवा लोनावळ्या जवळील कार्ला अथवा पुण्यापर्यंतच होती. (पुण्यात राहायचे म्हणजे, पुणे रेल्वे स्थानका समोरील मोरारजी गोकुळदास धर्मशाळेत, आणि नाशकात गाडगेबाबा धर्मशाळेत ). कार्ला , भाजं किंवा लोहगड-विसापूर म्हणजे दोन दिवसांचा कार्यक्रम असे. आधल्या दिवशी दौंड मनमाड पॅसेंजरने गेल्यास मळवलीला उतरायचे. तेथील एखाद्या शेतकऱ्याकडे वस्तीला रहायचं. आणि रात्रीच्या पॅसेंजरने गेल्यास पहाटे मळवलीला उतरायचे, शेतकऱ्याकडे सूर्योदयापूर्वीच आन्हीकं आटपायची आणि

बैलगाडीकरून उन्हं चढायच्या आत इच्छित स्थळ गाठायचे. असा कार्यक्रम असे, आणि हो हे सारं वर्णन १९६५ – ७०च्या आधीचं बरं. त्यानंतरच्या काळात आम्ही सकाळच्या डेक्कन एक्सप्रेसने जात असू. असो. तर या एवढ्याच प्रवासाचा अनुभव असणाऱ्यांनी एकदम गोव्याला जायचं म्हणजे परदेशवारीला निघण्यासारखंच होते. तर १९८० सालच्या मे महिन्यात आम्ही डझनभर मंडळी गोव्याला जाऊन आलो. त्यानंतर आत्या, मामी, काका यांचे सोबत आमच्या दूरच्या म्हणता येतील अशा कौटुंबिक सहली झाल्या. मला काही डायरी वगैरे लिहायची सवय नाही त्यामुळे बऱ्याचशा विस्मरणात गेलेल्या.

२०२२च्या दिवाळीत आमचे गोव्याला जायचे ठरले आणि जुन्या आठवणी ताज्या झाल्या. १०-१२ दिवसांत त्या लिहून काढल्या. यात कदाचित प्रसंगांची, स्थळांची सरमिसळ होण्याची शक्यता मी नाकारीत नाही .४२ वर्षांनी पुन्हा गोवा पहायला जायचं. त्या काळातील मुंबईहून गोव्यापर्यंतच प्रवास, दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून, मुंबई - मिरज – लोंढा – कॅसल रॉक - मडगाव असा होता. तर परतीचा, चक्क हॉलिडे स्पेशल नावाच्या अमर्याद थांबे व वेळ घेणाऱ्या गाडीतून मिरजहून अती पहाटे निघून दिवेलागणीला मुंबईत पोहोचविणारा, तो ही अनारक्षित डब्यातून. तर आताचा, कोंकणचा निसर्ग ‘विस्टाडोम’च्या डब्यातून पहात जायचं. तेव्हाच्या प्रवासाची साधनं, साऱ्यांचे एका

a

घरातील वास्तव्य, प्रायव्हसीची अत्यंत पुसट अशी व्याख्या. थोडक्यात मध्यमवर्गीय, पांढरपेशां सोबत. तर आता वातानुकूलित वाहनं, विमानं,अलीशान रिसॉर्टमध्ये वास्तव्य, प्रायव्हेट टॅक्सी... आणि आजूबाजूला नवश्रीमंत वर्ग. दोन सहलींची तुलना करण्याचा मुळीच उद्देश नाही. परंतु, त्या काळची प्रवासाची व्याख्या, साधनं एकमेकाना मदत करण्याची वृत्ती. (हो ना, रेल्वेतल्याच कितीतरी व्यक्ती अचानक आल्या आणि आम्हाला तिकीटं मिळावी म्हणून प्रयत्न करून गेल्या). या साऱ्यात एक मात्र जाणवलं की गेल्या चार दशकांत बरंच काही, की सारंच बदललंय ! गोव्याच्या दोनही सहली आम्ही साऱ्यांनी खूप एंजॉय केल्या. वाचकांना, त्यांनी केलेल्या अशाच आनंददायी सहलींच्या आठवणी याव्यात आणि त्या, इतरांना वाचावयास मिळाव्यात.

शैलेश न. पुरोहित

मुलुंड ३ नोव्हेंबर २०२२

सदर प्रवासाच्या चित्रफिती ***G.P.TravelDiaries या*** यूट्यूब चॅनेलवर पाहता येतील.

**https://youtube.com/playlist?list=PLnxSfW6tAnh3oQLyQTIyTfScppzn6b04l**





अविस्मरणीय गोवा – १९८०

एप्रिलचा महिना असावा, वर्ष १९८० आम्ही म्हणजे माझे आई-बाबा (अण्णा, अशीच हाक मारीत आम्ही त्यांना) व मी विलेपार्ल्याला माझ्या आत्यांकडे गेलो होतो. पार्ल्यात माझ्या तीन आत्या रहात होत्या, त्या पैकी सर्वांत धाकटी, वनिता आत्याच्या घरी आम्ही होतो.

विषय प्रवेशापूर्वी थोडेसे नमन, ... आमचे अण्णा, पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट येथील कार्यालयात नोकरी करीत व त्यांचे एक सहकारी, शिवा पी नागझरकरकाका साड्या, ड्रेस मटेरियल विकण्याच्या निमित्ताने आमच्याकडे तसेच माझ्या आत्याकडे नियमित येत असत. त्यांचं गोव्यात – मडगांव येथे – मोठे घर होते, व बरेचदा ते “गोव्याला येतां काय ?” असे विचारीत.

तर पार्ल्यात त्या दिवशी अण्णांनी आत्याच्या घरी सहजच, मे महिन्याच्या सुट्टीत, “गोव्याला जायचं काय ?” अशी विचारणा केली. नागझरकरकाका दोनही परिवारांच्या ओळखीचे असल्याने रहाण्याचा प्रश्न मिटला, आत्याने व

a

अण्णा (तिच्या यजमानांनाही ‘अण्णा’ असेच संबोधित) या दोघांनीही संमत्ती दर्शविली. गोव्याला जायचं म्हणजे एकतर बोटीने अथवा कॅनरा पिंटोच्या बसने (मला वाटतं, ‘पावलो’, कदंबच्या बसेस नंतरच्या काळांत मुंबई – गोवा मार्गावर धावू लागल्या) एवढंच साऱ्यांना ठाऊक. पण आमचे अण्णा होते रेल्वेत त्यांनी चौकशी केली तेव्हा मुंबई – मिरज व तेथून वास्को एक्सप्रेसने गोवा गाठता येतं, अशी माहिती मिळाली. “आता एप्रिल महिना सुरू आहे, तेव्हा मिळाल्यास मे महिन्याच्या शेवटाची तिकीटं मिळतील बहुतेक”, एका अनुभवी माणसाने अंदाज सांगितला. तेव्हा ‘तारीख’, तिकीट मिळेल ती, असे ठरले. अखेर आता जाण्या येण्याचे रिझर्वेशंन मिळालं की ‘चलो’ या विचारात दुसऱ्या दिवशी सकाळीच तत्कालीन व्ही टी स्टेशन गाठलं. त्याकाळात उन्हाळयाच्या सुट्टीत मुंबईबाहेर जाणाऱ्या गाड्यांच्या रिझर्वेशन साठी मोठ मोठे मांडव घातले जायचे व रात्री लोकं रांगेतच नंबर लावीत असत. पहातो तर रिझर्वेशन साठी प्रचंड रांगा लागलेल्या. खिडकीवर पोहोचल्यावर गाडी फूल झाल्याचे समजलं. निराश होऊन घरी परतलो. अण्णा, नागझरकरकाका त्यांच्या ऑफिसात दातारकाका होते, दादरलाच रहात, ऑफिसात अण्णांनी त्यांच्या कानावर हे घातले. संध्याकाळी ते घरी आले. त्यांनी किती जणं गोव्याला जाणार त्यांची यादी मागितली. आई-अण्णा, आम्ही तिघे भाऊ,मोठ्या भावाची पत्नी, वनिता आत्या - अण्णा , त्यांच्या तीन मुली (रश्मी, स्वाती,

a

निकीता ) व त्यांच्यासोबत बेबी. अशी बारा जणांची यादी घेऊन ते गेले. नागझरकरकाका आधीच गोव्याला जाणार होते. दातारकाकांसोबत आता चांदवडकरकाका ते देखील आमच्या घरा शेजारील गल्लीत रहात आणि भायखळ्याला स्टेशन मास्टर होते, ते ही मदतीला आले. जणू काही सारी रेल्वेच कामाला लागावी, त्यांनी कुठल्याशा  कोट्यातून महालक्ष्मी एक्सप्रेसची १६ मे ची टिकीटं आणून दिली. प्रवास साधा सोपा होता. रात्रीच्या महालक्ष्मी एक्सप्रेसने निघून सकाळी मिरजला उतरायचे, समोरच्या फलाटावर वास्कोला जाणारी गाडी येणार होती, तीत बसलं की दुपारी मडगांव. परतीच्या प्रवासासाठी, “वास्कोला टेलीग्राम केलेला आहे, तिकडे जाऊन पहा.” असे रेल्वे छापाचे उत्तर मिळाले. चला, आता १७ मे रोजी गोव्यात पोहोचायचे आणि १ की २ जूनची परतीची तिकीटं.

गोव्याला जायचे ठरल्यावर अगदी, दहावे शतक ते तेराव्या शतकापर्यंत कदंब राजवंश, त्यानंतर १३५० ते १४९२ बहामानी राज्य, पुढे १५१० पर्यन्त विजापूरच्या अमलाखाली व १५१० ते १९६१ पर्यन्त पोर्तुगीज असा गोव्याचा इतिहास डोळ्यापुढून सरकला.

ठरल्याप्रमाणे आम्ही १६ तारखेला महालक्ष्मी एक्स्प्रेसने निघालो. सोबत वनिता आत्याच्या अण्णांचा ‘बनी’ कॅमेरा, त्या सोबत १-२ रोल्स आणि आमचा आग्फा, ‘आयसोली IV’ हा १२० mm चा कॅमेरा, आमच्याकडे.

a

सोबत २ की ३ रोल्स. एवढ्यावर आम्ही गोव्याला निघालो. गाडीने कल्याण यार्ड ओलांडून कर्जतची वाट धरली आणि एक जोरदार धक्का देऊन ती उभी राहिली. धक्क्यातून सावरेस्तोवर बराच वेळ काहीही समजे ना. काही वेळाने गाडीच्या दुतर्फा लोक उगीचंच गाडीतून उतरून इकडे तिकडे करीत असताना दिसत होती. अंधारात काहीही समजत नव्हतं आणि आम्हा ‘मुलांना’ गाडी बाहेर जाण्याची परवानगी नव्हती. अखेर डब्यात कोणीतरी,कोणालातरी सांगत असल्याचे ऐकलं व बातमी आली, “इंजिनचं कपलींग तुटलंय.” वास्तविक कल्याण यार्ड, लोकोशेड (हा शब्द आता आता माहिती झाला) हाकेच्या अंतरावर होते, कशाने माहीत नाही परंतु, गाडी चांगलीच रखडली एवढे मात्र खरे. ती तेथून केव्हा सुटली हे पाहायला मी जागा नव्हतो.

सकाळी उठलो, किती वाजले माहीत नव्हतं पण उन्हं चांगलीच वर आली होती. बाकीचे बालगोपाळ निजले असल्याने खिडकी गाठली. गाडी कुठल्याशा स्टेशनावर थांबत होती. अण्णांनी मला विचारलं, “कोणतं स्टेशन आलं रे ?” मी डोळे किलकिले करून पाटी वाचली. “ सं पा ली “, हे कोणतं नवीन स्टेशन आलं म्हणत अण्णा खिडकीत आले आणि त्यांनी वाचलं “सांगली” ते कडाडले, “अरे मूर्खा सांगली आहे ते, म्हणजे पुढचं मिरज.” मग धावाधाव. कसे तरी बेडींग (हा प्रकार आता नष्ट झाला, हिरव्या जाडसर कापडाची अनेक कप्पे असणारी एक लांबलचक पिशवी

a

असे. तीत कपडे, पांघरूणे, धान्य, अगदी स्टोव्ह, तवा, भांडी, थोडक्यात साऱ्या जीवनावश्यक वस्तु सामावून घेणारं, की पकडून ठेवणारं - होल्ड ऑल – पोतंच ते , त्याची वळकटी करीत, त्याला दोन कातडी पट्टेही असत भोवताली, ते गच्च आवळून घ्यायचे.) बांधले व उतरण्यासाठी तयार झालो. मिरज स्थानकावर उतरल्यावर समजलं, आम्हाला गोव्याला घेऊन जाणारी मीटर गेजची गाडी तिच्या वेळेवर निघून गेलेली. समोरच्या फलाटावर मिरज-बंगळूर महालक्ष्मी एक्सप्रेस (मुंबई – कोल्हापूर महालक्ष्मीचं कनेक्शन) उभी होती. थोड्या वेळातच ती बंगळूरकडे रवाना झाली देखील. ‘डबल अण्णा’ स्टेशन मास्तरांच्या खोलीत जाऊन चौकशी करून आले, “दहा वाजताच्या गाडीनं लोंढयाला उतरायचं, तिथून दुपारी गोव्याला जायला गाडी मिळेल.” एका अण्णांनी आणलेली माहिती दिली. आता दहा वाजताच्या गाडीची वाट पहाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. सारी चिडीचूप मिळेल ते छप्पर की सावली धरून बसून राहिलो. अखेर ती गाडी अवतरली, त्यात डझनभर आम्ही सामानासकट घुसलो.

a



दुध सागर - १



दुध सागर - २

a

लोंढा जं. स्टेशन येईपर्यन्त सूर्य डोक्यावर आलेला. नंतर गोव्याची गाडी आली. तीतून कॅसल रॉक हे टुमदार स्टेशन, दूध सागरचा नयनरम्य परिसर पहात ब्रिगांझा घाटमार्गे संध्याकाळी साडेसातच्या सुमारास आम्ही मडगांव स्टेशनवर उतरलो. ८० साली गोव्यात संध्याकाळी ७ नंतर रस्त्यात सर्वत्र सामसूम. कशीबशी एक हातगाडी मिळाली, तिवर समान चढवून आम्ही निघालो. नागझरकरकाकांनी ते गोव्याला पोहोचताच एक पत्र पाठवले होते, त्यावर पत्ता होता. 'शिवा पी नागझरकर, दामोदाराच्या साला शेजारी, रुआ दू आबादे फारीया, मडगांव. अखेर साडे आठ - पावणे नऊच्या सुमारास आम्ही त्या पत्त्यावर पोहोचलो. "तुम्हाला रिसिव्ह करायला मी स्टेशनवर गेलो होतो, "गाडी आली,पण तुम्ही नाय दिसला, मग परत आलो." काकांनी आपल्या टिपिकल गोयंकरी आनुनासिक आवाजात सांगितले. बरं त्या काळांत मोबाइल नाही की STD, ट्रंक कॉल लावल्यास कित्येक तासांनी लागे. आणि घरोघरी फोन तरी कोठे होते ? तर काकांशी संपर्क साधाणे एकंदरीतच अशक्य कोटीतील बाब.

बाहेर सर्वत्र कर्फ्यू लागल्यासारखी शांतता आम्ही येताना अनुभवली होती. बाहेर जेवायला जाणार कोठे आणि कसे ? घरासमोरच एक बेकरी होती आणि काकांनी बच्चे कंपनी येणार म्हणून बटर, टोस्ट, पांव आणून ठेवले होते. मग त्यावरच त्या रात्रीची गुजराण केली आणि थकले भागले जीव अनेक खोल्यांच्या प्रशस्त घरात ऐसपैस पसरले.

a


दुसऱ्या दिवशी कोठेही न जाता आराम करायचा निर्णय सहल श्रेष्ठींनी घेतला. मग काकांनी घर दाखवलं. रस्त्यावरून एक खणी वाटणाऱ्या घरात आतमध्ये दहा – बारा प्रशस्त खोल्या होत्या, मधल्याभागात मोकळी जागा, पहिल्या मजल्यावर तितक्याच खोल्या, जावळे अण्णा नाट्यसंगीत प्रेमी, ते वरचा माळा चढू लागले की, “माडी वरी चल ग गडे” कधी स्वच्छ आवाजात म्हणत, तर केव्हा गुणगुणीत. बऱ्याचशा बंद, कारण काका, त्यांचे कुटुंबीय मुंबईत रहात व अधून मधून येथे येत असत, एरवी बंदच. त्या दिवसांत लॉंड्री वगैरेंची पद्धत नव्हती, आणि आज कोठे जायचे नाही म्हटल्यावर गृहीणींनी घराच्या मधल्या चौकात दोऱ्या बांधून धोबी घाटाची तात्पुरती उभारणी केली. दुपारच्या भोजनाकरिता अण्णांनी आंबे आणले होते. आमरस, समोरच्या बेकरीतून आणलेले ताजे पांव व गरमागरम आंबटवरण, भात असा बेत होता. संध्याकाळी काका मार्केटमध्ये जाऊन दुसऱ्या दिवसाच्या पर्यटना करिता मॅटेडोर ठरवून आले.

तिसऱ्या दिवशी इडलीची न्याहारी करून आम्ही सर्वप्रथम शांतादुर्गा मग मंगेशी ही मंदिरं पाहिली, रस्त्यात बांदोडकरांचा गणपती व उद्यान लागलं. नंतर कामतकडे जेवण. त्या काळात गोव्यात केवळ कामत हॉटेलात शाकहारी भोजन मिळेल असं आमच्या मनावर बिंबलं होते, कदाचित त्यामुळे आम्ही इतरत्र शाकहारी अन्नाचा शोध

घेतलाच नसावा. दुपारी सेंट झेवियरचे शव पहायला बॉम जिजस चर्च, अर्थात ते बऱ्याच उंचीवर ठेवले असल्याने व ठराविक वर्षांनी ते उतरवीत असल्याचे समजले. त्यामुळे, आम्ही ते पाहू शकलो नाही. त्यानंतर समोरील म्युझियम आणि संध्याकाळी घरी. रात्री सारं काही सुरळीत चालू असताना अचानक वीज गेली. आम्हा मुंबईकरांना अंधाराची सवय अजिबात नाही, मग काय एकच गडबड उडाली. काकांना हे सारं माहिती, त्यांनी मेणबत्त्या आणून ठेवल्या होत्याच. मग काय, गोव्यात कँडल लाइट डिनर.

चौथ्या दिवशी त्याच टेम्पोने दोनापावला, बीचेस व पणजीत भोजन करायचे ठरलं. सकाळी निघायला काहीसा उशीरच झाला मग दोनापावला करून दुपारी बारा – साडेबाराच्या सुमारास आम्ही मिरामार बीच वर पोहोचलो. त्या काळी कलंगुट, मिरामार 'हिप्पीं' साठी प्रसिद्ध होते. परंतु रखरखीत दुपारच्या तापलेल्या वाळूने आम्हाला परत फिरविले. त्या नंतर पणजी गाठलं आणि भोजनासाठी कामत हॉटेलची शोधाशोध सुरू झाली. बेचाळीस वर्षांपूर्वी पणजीत 'कामत'देखील दुर्मिळ. नेहमीप्रमाणे हॉटेल उत्तरेला तर आम्ही दक्षिणेला शोध घ्यायला सुरुवात केली. अखेर माधवाश्रमात पोहोचलो. साऱ्यांना प्रचंड भूक लागली आणि वनिता आत्या अचानक उठली व गाडीत जाऊन बसली. तिच्या पाठोपाठ आई देखील गाडीत जाऊन बसली. चौकशी करता म्हणाली, "ई, माशांचा वास येतो. मला

नाही जेवण जाणार.” आम्ही सारेच शाकहारी, पण भूक एवढी लागली होती, आणि आमच्याकडे पाहून हॉटेलवाल्यांनी आमची वेगळी बसण्याची सोय केली होती.




पणजी - मांडवी नदीवरील पुल



दोना पावला

a

आता गोव्यातल्या हॉटेलात माशांचा वास हा येणारच. अखेर ज्यांना जेवायचे असेल त्यांनी माधवाश्रमात जेवावे, नंतर कामत शोधू असे ठरले. आम्ही जेऊन गाडीत आलो. आता कामत हॉटेल शोधायचे. फिर फिर फिरलो आणि एकदाचं कामत समोर पोहोचलो तर हॉटेल तीन दुपारी वाजता बंद. तर चौथी दुपार चांगलीच तणातणीची गेली. त्या दिवसांत पणजीला जाण्याकरिता पूलाचे बांधकाम चालू होते व वाहनं फेरीतून पलीकडे नेत. हे सारं आम्हाला नवीनच होते. आमची मॅटाडोर देखील मला वाटत, कुठ्ठुळी पर्यन्त फेरीतून पलीकडच्या तीरावर नेली.

पाचव्या व सहाव्या दिवशी प्रचंड उकडत होते तेव्हा घरीच आराम केला. भरपूर आमरस पांव ओरपला. सातव्या दिवशी तेथून गोकर्ण महाबळेश्वरचा बेत आखला. सकाळी आम्ही बसने मडगांवहून सदाशिवगड - कारवार, तेथून अंकोल्या पर्यन्त दुसऱ्या बसने, तेथून आणखी एक बस पकडून गोकर्ण महाबळेश्वर. मजल दरमजल करीत तेथे पोहोचेस्तोवर संध्याकाळ झाली. तेथे कृष्ण भट्ट मूळे यांचेकडे वास्तव्य केले. त्याना नागझरकरकाकांनी पत्र पाठवून आम्ही येतो हे कळवले होते की कसे ते माझ्या पर्यन्त पोहोचले नाही. असो. रात्रीच्या वेळी सांर भात, सांबार भात व एक भाजी असा साधाच परंतु स्वादिष्ट बेत होता. घरातील मंडळीच बादलीतून वरण, सांर, सांबार, विशेषतः लोणकढं तूप उभ्याने वाढतानाचं दृश्य मोठे गंमतीदार वाटलं. रात्री जोरदार वारं सुटलं आणि पाऊस आला.

a



गोकर्ण महाबळेश्वर



गोकर्ण महाबळेश्वर मंदिर


a

त्या नंतर मात्र वातावरण चांगलंच थंड झालं. कृष्ण भट्ट मूळेंच्या ओसरीवरच त्यांचे सोबत थोरांच्या गप्पा ऐकत केव्हा निद्राधीन झालो हे समजलेच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी देव दर्शन करून तिथल्या बाजारात हिंडलो. न्याहरी करून कृष्ण भट्ट मूळे यांचा निरोप घेतला. परतीच्या प्रवासात अंकोला येथे काही काळ थांबलो. तेथे काजू उत्तम मिळतात असे समजले, काजूची खरेदी झाली मग मंडळी कारवारमार्गे मडगांवच्या प्रवासाला लागली. घरी परते पर्यन्त अंधार पडला होता.

त्या नंतरचे गोव्यातील दिवस सकाळ संध्याकाळ आमरस- पांव तर एक दोन दिवस आमरस पोळी हाणत घालवले. एक दिवस मडगांव स्टेशनवर जाऊन रिझर्वेशन कन्फर्म झालेले आहे काय हे पाहायला काका व अण्णा गेले, चौकशी खिडकीवर त्याबाबत विचारणा करता त्याने “टेलिग्राम दाखवा” असा प्रतिप्रश्न केला, तेव्हा शोधाशोध सुरू झाली आणि लक्षांत आलं. निघायच्या गडबडीत व रिझर्वेशन मिळाल्याच्या आनंदात टेलिग्राम घ्यायचाच राहिला. झालं, आता १२ जणांना घेऊन मुंबईला परतायचं कसं ? मोठा प्रश्न उभा राहिला. मग इकडे तिकडे चौकशी केली एकानं माहितगाराने धीर दिला. म्हणले, इकडून वास्को - मिरज पॅसेंजर ने मिरज गाठा, तिकडून मुंबईसाठी हॉलिडे स्पेशल निघते , तिने तुम्ही मुंबईला जाऊ शकता. मग त्या माहिती मागे सारे लागले.

मडगावला पॅसेंजरमध्ये चढणे कठीण जाईल म्हणून आम्ही वास्कोला मिरज पॅसेंजर पकडायला गेलो. वास्को ते मिरज या प्रवासात दुसऱ्यांदा दूधसागरचे दर्शन झाले. त्या काळी ते आजच्या प्रमाणे पर्यटन केंद्र झाले नव्हते. धावत्या रेल्वेमधून फोटो देखील काढले, इतक्या वर्षांनी ते थोडंसं शोधल्यावर मिळाले. एकंदरीत तो प्रवास छान झाला. रात्रीच्या अंधारात मिरजला हॉलिडे स्पेशल पकडण्याची दिव्य कामगिरी आम्हापैकी कुणालाही जमणार नाही, हे वास्तव लक्षांत घेऊन हमाल ठरवला, त्याने आपला पितळी बिल्ला दाखवत सांगितले “९ नं. लक्षांत ठेवा आम्ही दोन बाकं अडवतो, दोन तीन पुरुषांनी आमच्या मागे पहिलं गाडीत चढा, बायका, मुलं, सामान नंतर खिडकीतून चढवू.” त्याकाळी दूरच्या गाड्यांच्या खिडक्यांना गरांद्या नसत. अखेर त्यांनी दोन बाकं अडवली, स्टेशनावरच्या दिव्यांच्या प्रकाशात समान, महिलावर्ग, बालगोपाळ चढले, आम्ही यथावकाश स्थिरस्थावर झालो आणि मग गाडीतील दिवे प्रज्वलित झाले. पहाटे पहाटे गाडी मुंबईच्या वाटेला लागली. प्रवासाच्या अखेरच्या टप्प्यात कराड, किर्लोस्करवाडी, वाठार, पुणे करीत तीन तारखेला संध्याकाळी आम्ही दादरला उतरलो एकदाचे. या तऱ्हेने आमच्या अविस्मरणीय अशा गोवा ट्रीपची सांगता झाली




दुध सागर

# Go go गोवा ...२०२२



मे महिन्याच्या अखेरीस एका रविवारच्या सकाळी श्रावणी (आमच्या सौ.) व मी चहा घेता असताना दिवाळीच्या सुट्टीत कोठेतरी जाण्याचा विचार हीच्या मनात डोकावला. मी म्हटलं, २०१९ मध्ये आपण वायनाडला (केरळला) गेलो होतो त्या नंतर कोरोंनामुळे कोठे जाणंच झालं नाही तेव्हा जायला काही हरकत नाही. नेहमी प्रमाणे सुरुवातीला नेपाळला जावं काय ? नेपाळला जायचे असल्यास उल्का - हेमंत याना विचारू काय ? हिने प्रश्न केला. गेल्या दहा अकरा वर्षांत उल्का, हेमंत ( माझी जेष्ठ मेहुणी व साडू) या वेलणकर दाम्पत्यासोबत आमच्या बऱ्याच दूरच्या सहली झालेल्या होत्या. तेव्हा नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. आता गंधर्व (आमचे चिरंजीव) आम्हाला जॉइन झाले. त्याने बसल्याबसल्या नेपाळची सारी माहिती काढली. संध्याकाळी आम्ही हेमंतच्या घरी, ठाण्याला गेलो. त्याला विचारले, “दिवाळीत कोठे जाण्याचा काही प्लॅन आहे काय ?” तो म्हणाला, “अजून तरी नाही, तुझा काही असल्यास सांग.” मी नेपाळचा विषय काढताच त्याने ‘आरसीआय’ च्या रिसॉर्टची तपासणी सुरू केली. दिवाळीच्या आधी चार – पांच दिवस जाऊन दिवाळीच्या दिवसांत परत असा कार्यक्रम ठरला. कारण मंथ एंड पूर्वी श्रावणीला

ऑफिस गाठायचे होते. गंधर्वने हेमंतच्या मोठ्या T.V. वर आपला लॅपटॉप जोडून छोटेसे प्रेझेंटेशनच सादर केले. मग विमानाच्या तिकीटांची तपासणी सुरू झाली. गणितं जुळत होती. लवकरात लवकर मुंबई – पारो ची तिकीटं बुक करायची असे जवळ जवळ ठरलं. तेवढ्यात उल्काने शिलॉन्गला क्लब महिंद्रने नवी प्रॉपर्टी घेतल्याचे सांगितले आणि आपोआप नेपाळ मागे पडलं. पुन्हा आठ - पंधरा दिवसांनी भेटण्याचे ठरवून आम्ही परतलो.

साधारण जूनच्या मध्याला पुन्हा आम्ही भेटलो. शिलॉन्गला जायचे तर मुंबई – गुवाहाटी – शिलॉन्ग मार्गावरील विविध पर्याय तपासले. विमानांच्या तिकीटांचे दर तपासले. मुंबई – गुवाहाटी विमानाने व नंतर झाडी, डोंगर पहात शिलॉन्गचे हॉटेल गाठायचे ठरले. हेमंतने क्लब महिंद्रला दिवाळीपूर्वी वा दरम्यानच्या तारखांची उपलब्धता विचारणारी मेल लिहिली. सोमवारी सकाळी तिचे रिसॉर्ट दिवाळीपूर्वी आणि ऐन दिवाळीत एकही दिवस उपलब्ध नसल्याचे उत्तर आले.

आता सगळेच काहीसे नाराज झालो होतो. पुन्हा एक बैठक.. आता दक्षिणेकडे मोर्चा वळवला ... अष्टमूडी , केरळ बॅक वॉटर, मुन्नार वगैरे तपासत अनेक नकार घेत आमची गाडी गोव्याला पोहोचली. नुकताच पावसाळा संपला असेल, निसर्गही छान असेल तेव्हा, विस्टा डोमने प्रवास करीत गोवा गाठावे व येताना विमानाने यावे असे

a

ठरले. गोव्यात असनोरा (अस्नोडा) येथे क्लब महिंद्रने वर्षभरापूर्वी प्रॉपर्टी घेतल्याचे समजले. तेथे विचारणा केली ते २४ ऑक्टोबरपासूनच उपलब्ध होते. दुसऱ्या दिवशीच २४ तारखेची जनशताब्दीच्या विस्टा डोमची पांच तिकीटं रिझर्व्ह केली... आणखी काही दिवसांनी गंधर्वने बातमी दिली, तेजस एक्सप्रेसला देखील सप्टेंबर महिन्यापासून विस्टा डोमचा डबा लागणार.

२४ ऑक्टोबरला सकाळी पाचपन्नासला जनशताब्दी ठाण्याला येणार तर आम्ही पांच वाजताच ठाणे स्थानकावर पोहोचलो. गाडी येताच T T ने दारातच तिकीटांची विचारणा केली, त्या नंतर मात्र कुणीही फिरकलं नाही. नावडे येई पर्यन्त चांगलच उजाडलं होतं. विस्टा डोमच्या डब्यात गुजराती भाषिक प्रवाशांचे ८ -१० जणांचा एक असे २ – ३ समूह होते आणि ४४ आसनी डब्यात सर्वत्र पसरले होते. डब्यात चहा, नास्ता, भोजनाची व्यवस्था असल्यामुळे प्लॅटफॉर्मवर अन्नपदार्थ शोधणे टळले. या डब्यात साऱ्या सुविधा आहेत, फक्त छायाचित्रण करताना डब्यातील दिव्यांच्या प्रकाशाने खिडक्यांच्या काचेत आपलेच प्रतिबिंब दिसतं त्यामुळे छायाचित्रणांवर काहीशा मर्यादा येत होत्या.

मुंबई ते गोवा दरम्यान या डब्यातून केलेला प्रवास खरंच छान होता. परंतु सलग नऊ – साडे नऊ तासांच्या या प्रवासाने डब्यातील लहान मुले व त्यांचे पालक कंटाळलेले वाटले, मग समभाषिक मुलांची मस्ती सुरू झाली. रोहा – खेड – चिपळूण - रत्नागिरी – राजापूर, अगदी थेट थिवींला उतरेपर्यंत कोंकणचे हिरवेगार डोंगर, उंच पुल, बोगदे, त्यातून जाणारी रेल्वे हा सारा डोळ्यांचे पारणं फेडणारा पट नंतरही बराच काळ डोळ्यासमोरून जाइच ना .

दुपारी साडेतीनच्या सुमारास आम्ही थिवीं स्थानकात उतरलो. उतरताच गोव्यातील टॅक्सी माफियांचा अनुभव घेतला. थिवीं रेल्वेस्थानक ते रिसॉर्ट पांच – सहा किलोमीटर्स अंतराला पाचशे रुपये द्यावे लागले. रिसॉर्टच्या स्वागत कक्षात सुंदर रांगोळीने तसेच आमचे, क्लब महिंद्रच्या प्रथेप्रमाणे कुंकुम तिलक लाऊन स्वागत झाले.





रिसॉर्टचा स्वागत कक्ष

a

चेक इन होत असतानाच आम्हाला संध्याकाळी साडेसात वाजता कार्यक्रमासाठी B-liveच्या सभागृहात येण्याचे निमंत्रण मिळाले. त्यानंतर इलेक्ट्रिक वाहनाने आम्ही खोल्यांवर जाऊन ताजेतवाने होऊन हाय टी साठी आलो.

हाय टी नंतर आम्ही मोर्चा रिसेप्शनकडे दुसऱ्या दिवसांचा कार्यक्रम ठरविण्याकरिता वळविला. तेथे जाऊन ट्रॅव्हल डेस्कची विचारणा करता आम्हाला, “या रिसॉर्टमध्ये ट्रॅव्हल डेस्कच नाही” असे सांगत बाहेरच्या टॅक्सी स्टँडचा नंबर देऊन त्यांचे सोबत कार्यक्रम ठरविण्याचा सल्ला देण्यात आला.

संध्याकाळी साडेसातच्या सुमारास निमंत्रणाप्रमाणे कार्यक्रमाला गेलो. बरोबर अकरा वर्षांपूर्वी (२०११) आम्ही लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नौकूचीयाताल (उत्तराखंड) येथे होतो, तेथील क्लब महिंद्रने लक्ष्मीपूजन व त्या नंतर छोटासा कार्यक्रम केला होता. तसे काहीसे असेल या तयारीने आम्ही तेथे गेलो. परंतु, तसे काही नव्हते. लहान मुलांनी सादर केलेले नाच इत्यादि कार्यक्रम होते. आपापल्या मुलांचे कार्यक्रम झाल्यावर पालक मुलांना घेऊन तेथून जाताना दिसत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेपाचला पक्षांच्या किलबिलाटाने जाग आली. बाहेर छानसं दंव पडत होते. बाहेरच्या झाडांच्या पानांपानांवर दंवबिंदू , दृश्य एवढं अप्रतिम दिसत होते. कॅमेरा घेऊन गॅलरीत गेलो पण हाय, माझी चाहूल लागताच पक्षी काहीसे पांगले. बाकीचे उठण्याआधी रिसॉर्टमध्ये फेरी मारावी म्हणून निघालो. सुरुवातीला रस्त्यात मी एकटाच होतो, पण पुढे पुढे कुणी हाताला कसलासा बेल्ट बांधलेल्या, कुणी कानाला हेडफोन लावलेल्या (बहुधा आपापल्या देवांची स्तोत्रं ऐकत असावी अशी मी समजूत करून घेतली) व्यक्ती दिसू लागल्या. या नवश्रीमंतांचं वागणं मला नेहमी कोड्यात टाकतं. दिवसा ही मंडळी पनीर, चीज, बटरवर ताव मारताना दिसतात आणि सकाळी स्वतःला मेंटेन राखण्यासाठी हे सारं. असो. रिसॉर्टच्या रेस्टॉरांमागे असणाऱ्या हिरवळीवर पदत्राणं काढून हिंडण्याचा वेगळाच अनुभव आला. दंव पडलेल्या मऊ जम्पिंग ग्रासवर चालायला सुरुवात केली थोड्यावेळाने हेमंत – उल्काही आले. या मोकळ्या मैदानातही रॉबिन वगैरे पक्षी स्वैर संचार करीत होते, पण कॅमेरात टिपले जात नव्हते.

आज २५ ऑक्टोबर सूर्यग्रहण असल्याने दुपार नंतर मंदिरे बंद असणार होती मग आजचा दिवस रिसॉर्टमध्येच काढण्याचा निर्णय सहल श्रेष्ठींनी घेतला. महिंद्रचे हे रिसॉर्ट उत्तर गोव्यातील थिवीं रेल्वे स्थानकापासून साधारण पांच

a

किलोमीटर अंतरावरील टेकड्यांच्या १२ एकर जमिनीवर २०८ खोल्यांमधून पसरलेले आहे. रिसॉर्टमध्येच adventure park सह पांच प्रकारचे पाणवठे (कृत्रिम धबधबे, lazy river, लहान मुलांसाठी जलबोगदा तर मोठ्यांसाठी जलतरण तलाव, ई.) आहेत. B-live मध्ये सुद्धा बरेच खेळ आहेत.



या रिसॉर्टमध्ये ३५ शेफ सेवेला हजर असतात. रात्रीसाठी खास ५ शेफ कामावर असतात असे समजले. त्यामुळे इतरत्र कोठेही न जाता रिसॉर्ट मध्ये राहून ‘जिवाचं गोवा’ करता येतं. टाळेबंदीची बंधनं उठल्यानंतरची ही पहिलीच दिवाळी त्यामुळे रिसॉर्ट माणसांनी दुथडी भरून वहात असल्याचा भास व्हावा अशी स्थिती. रिसॉर्टमध्ये एकही खोली उपलब्ध नसल्याचे आम्हाला सांगितले गेले. दिवसरात्र पर्यटक येत जात असल्याचे प्रत्यक्ष दिसतही होते.





आज २६ ऑक्टोबर सकाळीच न्याहारी करून बाहेर पडलो तो रिसॉर्टच्या रिसेप्शन मध्ये संगीताचा कार्यक्रम एक स्थानिक कलाकार सादर करीत होता.

गाण्याच्या तालावर पर्यटक देखील फेर धरत होते.

वर्षारंभ सांखळी येथील महादेव मंदिरापासून केला. मंदिराजवळच हर्वलीं नावाचा छोटासा धबधबा आहे. तेथून कुंकळीचे बालाजी मंदिर येथे गेलो. मंदिरात बरीच गर्दी होती. तेथून दुपारी दोनच्या सुमारास सहकारी स्पाईस गार्डनला पोहोचलो. येथे प्रवेश शुल्कात भोजनाचा समावेश असतो. तेव्हा प्रथम पोटपूजा केली व नंतर जवळजवळ पाऊण तास मार्गदर्शका समवेत तेथे असलेल्या विविध झाडांची माहिती घेतली. अशाच प्रकारचे स्पाईस गार्डन केरळला पाहिल्याचे आठवले.


सांखळी धबधबा




तेथून मंगेशी मंदिर, म्हाळसा मंदिर व शांतादुर्गा मंदिर येथे गेलो. शांतादुर्गा मंदिराच्या अंगणात खालील फलक लावलेला पहिला. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी आमच्या पुढे रांगेत उभ्या असणाऱ्या तरुणींचा तेथील सेविके सोबत झालेला संवाद,''मॅडम ऐसे कपडे पहनके आप मंदिर मे नही जा सकती, आप ये कपडा पहन लो.'' असे म्हणत त्या सेविकेने एक वस्त्र कंबरेभोवती गुंडाळण्यास दिले. त्यावर तिचे उत्तर,''हम गोवा घुमने आयें है.'' असे होते. त्यावर तिने चांगलेच सुनावले. "मॅडम गोवा के लोंग मंदिर मे ऐसे कपडे पहन के नही आते." सुशिक्षित असणाऱ्या तरुणाईला कोठे कोणता पोशाख परिधान करावा यांचे भान नसावे याचे आश्चर्य वाटलं

.तेथून बॉम जिजस चर्च जे ५ सप्टेंबर पासून इमारतीच्या डागडुजीकरिता बंद होते. त्याच्या समोरील म्युझियम ला धावती भेट दिली. जुन्या गोव्यामधील बेसिलिका जवळील सेंट ऑगस्टीन टॉवरजवळून गेलो. गोव्यातील मॉन्टे सँटो (पवित्र टेकडी)वर हे प्रचंड चर्च १६०२ मध्ये १२ ऑगस्टीन मित्र म्हणा अथवा धर्मगुरूंनी म्हणा बांधले. ऑगस्टीयंन शैलीची संपूर्ण विश्वात केवळ तीन चर्चेस होती. १. गोव्यात. २. एल एस्कोरियल , स्पेन . ३. मॉनेस्ट्री ऑफ साओ व्हीसेंट डी फोरां, लिस्बंन, पोर्तुगाल. पुढे १८३५ नंतर गोव्यातील पोर्तुगीज राजवटीने ते चर्चच्या वापरावर बंदी आणली. पुढे १८४२ पासून इमारतीची पडझड सुरूझाली. १९३१ मध्ये सर्वात मोठा भाग कोसळला. आजमितीला या परिसरात वरील चित्रात दिसणारा केवळ मनोरा व जागोजागी लावलेले माहिती फलक पहाता येतात इतकेच.





काही वर्षांपूर्वी या परिसराला ‘हेरिटेजत्व’ बहाल केले गेल पणजी चर्चला मी गाडीतून उतरलो व जुन्या सेक्रेटरीएट जवळ असलेल्या आबादे फारीया यांच्या सुप्रसिद्ध शिल्पापाशी येऊन उभा राहिलो. फारीया १७५६ साली गोव्यात जन्मले, पुढे रोम मधील शिक्षणानंतर लिस्बन येथून धर्मगुरूपद ते त्यांनी केलेले संमोहन विद्येचे विविध प्रयोग. या व्यक्तीचा इतिहास डोळ्यापुढून गेला.

a

पुढे रस्ता शोधीत फॉन्तेनास् भागात गेलो. या विभागाची माहिती समजली ती काहीशी अशी.. या जागेचा शोध १८व्या शतकात अँटोनियो डी सिक्वेरा या पोर्तुगीज दानाढ्यास लागला. त्याने तेथे नारळाची झाडे लावली. पुढे गोव्यात साथीच्या रोगांमुळे पोर्तुगीजांनी त्यांचे सचिवालय पणजीत आणली व फॉन्तेन्हास् भागात नारळाची झाडे हटवून पोर्तुगीज अधिकाऱ्यांसाठी इमारती बांधल्या. पुढे १९८४ सालात हा भाग हेरिटेज विभाग म्हणून घोषित झाला. येथे 'फिरताना हेरिटेज टुर' करणारे समूह दिसले. आज या भागात instagram वर रील बनवण्यासाठी तरुणाई कार्यरत असते. तर येथील घराघरात परदेशी नागरिक मद्य व इतर खाद्यपेयांचा आस्वाद घेत असल्याचे पहायला मिळाले.

a




शैलेश पुरोहित


Lok Chetana Primary School

एव्हाना संध्याकाळचे सहा वाजत आले होते. आमच्या चालकाने “आता क्रूझवर जायचे काय?” असे विचारले. कॅसिनो किंवा इतर गोष्टींत आमच्यापैकी कुणालाही रस नसल्याने रिसॉर्टवर आम्ही परतलो.

२७ ऑक्टोबरला गंधर्व व मी, आम्ही मुंबई – मडगांव रेल्वे मार्गावर असणाऱ्या ‘सूरवली’ या गार्डन स्टेशनवर जायचे ठरवले. सकाळी लवकरच आम्ही अस्नोडा बस स्थानक गाठले, तेथून पणजीसाठी बस मिळाली. पणजीहून शटल बसने मडगांव व तेथून पायी सूरवलीला पोहोचलो. साधारण दुपारी बारा ते दोन पर्यन्त आम्ही तेथे होतो. त्या छानशा स्टेशनचे काही हे फोटो. शहरात असून गावाचा फील देणारे हे स्टेशन.







a

सुरवलीहून परतीच्या प्रवासात पणजीतील शतकभर जून्या ‘कॅफे भोसले’ यांचेकडे गोवन सामोसे व पुरी भाजी (बटाट्याची पातळसर भाजी व अलसण्याची –तांबड्या राजम्याची- उसळ ) खाऊन तृप्त झालो.




a

२८ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास रिसॉर्टवरून परतीच्या प्रवासास निघालो. रमत गमत साडेतीनच्या सुमारास दाभोलीं विमानतळावर पोहोचलो. विमान होते सहा पंचवीसचे . पायलटने गोवा ते मुंबई हे अंतर एकतास वीस मिनिटांत पार होईल म्हणून जाहीर केले. प्रत्यक्षात विमान सव्वासांत वाजताच मुंबई विमानतळावर उतरले. विमान उतरून टॅक्सी वे वरुन विमानतळ इमारतीपाशी जातच होते, अचानक एक माऊली उठून उभी राहिली व आसनांवरील ‘फडताळ’ उघडून काहीसं शोधू लागली. भांबावलेली एअर हॉस्टेस मोठ्याने ओरडत आली व तिने ते बंद केले. मात्र सामान ताब्यात येण्यास आठ वाजले. येथे कुणाला काही करता येईना शांतपणे पट्ट्या भोवती सामानाची वाट पहात उभे राहण्याला पर्याय नव्हता. अशा प्रकारे आमच्या गोवा सहलीचे सूप जरी वाजले तरी या प्रवासात खाण्यात आलेल्या चिकन कॉफ्रीएल, गोंवन फिश करी, तंबोशी फ्राय वगैरे गोंवन पदार्थांची चंव बरेच दिवस जिभेवर रेंगाळणार हे निश्चित.

.

* * * *

a



a

**जग सुंदर आहेच.**

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य "जाणवू" लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

a

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

a

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

esahity@gmail.com

a

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com